प्रेस नोट दि.२३/०७/२०१९

---

## खडक पोस्टे तपास पथकाची कामगिरी

## सावित्रीबाई फुले विद्यापीठात नोकरीला लावतो म्हणुन फसवणुक करणाऱ्या सराईत भामटयाला शिताफीने अटक करण्यात पोलीसांना यश

सदर बाबत अधिक माहिती अशी की, खडक पोलीस स्टेशन तपास पथकातील अधिकारी/कर्मचारी हे खडक पोलीस स्टेशनला हजर असतांना पोलीस पोकॉ महावीर दावणे व पोकॉ आशिष चव्हाण यांना त्यांचे बातमीदाराने बातमी दिली की, सुमारे चार महिन्यापुर्वी इसम नामे भारत शिवाजी खेडकर रा.वंजारवाडी ता.बारामती जि.पुणे व त्याचा भाऊ नामे यशवंत शिवाजी खेडकर रा.सदर या दोघांनी मिळुन फिर्यादी नामे सौ.सुलभा अरुण बनसोडे वय ६० वर्षे रा.गुरुवार पेठ पुणे यांना त्यांचे मुलास सवित्रीबाई फुले विदयापीठात क्लार्क या पदावर नोकरी लावतो म्हणुन ७,००,०००/- रुपये रोख रक्कम घेवुन फसवणुक केली असुन ते दोघेजण गुन्हा घडले पासुन फरार आहे, त्यातील आरोपी नामे भारत खेडकर हा चौधरवस्ती बारामती येथे आला आहे, अशी खात्रीशीर बातमी मिळाली, त्याप्रमाणे रितरस वरिष्ठांचे परवानगी घेवुन मा.श्री.भरत जाधव वरिष्ठ पोलीस निरीक्षक खडक पोलीस स्टेशन यांचे मार्गदर्शनाखाली चौधरवस्ती बारामती येथे जावुन आरोपीचे ठावठिकाणा याबाबत स्थानिक पोलीसांची मदत घेवुन गोपनियरित्या माहिती प्राप्त करुन मिळालेल्या बातमीचे अनुषंगाने कार्यवाही करुन सदर इसमास ताब्यात घेतले, तेव्हा त्यास त्याचे नाव पत्ता विचारता त्याने आपले नाव भारत शिवाजी खेडकर वय २८ वर्षे रा.वंजारवाडी ता.बारामती जि पुणे असे असल्याचे सांगुन त्याचेकडे दाखल गुन्हयाचे संदर्भात तपास करता त्याने गुन्हयाची कबुली दिल्याने त्यास खडक पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं १७४/२०१९ भा.दं.वि क ४२०, ४६६, ४६८, ४७१, ५०६, ३४ या गुन्हयात दिनांक १८/७/२०१९ रोजी अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा तपास कल्याणी पाडोळे महिला पोलीस उप निरीक्षक खडक पोलीस स्टेशन पुणे हे करीत आहेत.

सदर आरोपीची पार्श्वभुमी पाहता, भारत शिवाजी खेडकर व यशवंत शिवाजी खेडकर रा.वंजारवाडी ता.बारामती जि.पुणे या दोघांनी मिळुन खडक, विश्रामबाग, डेक्कन, वेळापुर, सांगोला, सोलापुर येथील अशा कित्येक इसमांना सावित्रीबाई फुले विद्यापीठात व इतर ठिकाणी नोकरील लावतो या आमीषाने त्यांची लाखो रुपयांची फसवणुक केलेली आहे.

वर नमुद सर्व कारवाई ही श्री. श्रीकांत तरवडे, अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग पुणे, श्रीमती स्वप्ना गोरे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ १ व श्री. प्रदिप आफळे ,सहा पोलीस आयुक्त फरासखाना विभाग यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस स्टेशन चे श्री.भरत जाधव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.उत्तम चक्रे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) तपास पथकाचे प्रभारी श्री.उमाजी राठोड, सहा पोलीस निरीक्षक, कल्याणी पाडोळे म.पोलीस उप निरीक्षक, व पोलीस कर्मचारी, विनोद जाधव, गणेश सातपुते, संदिप पाटील, महावीर दावणे, आशिष चव्हाण, इम्रान नदाफ, राकेश क्षिरसागर, समीर माळवदकर, बंटी कांबळे, प्रमोद नेवसे, रवी लोखंडे, योगेश जाधव, विशाल जाधव, हिम्मत होळकर यांचे पथकाने केली.